| | |
|---|---|
| MHWS090004762022 | दाखल दिनांक : २५.०३.२०२२<br>नोंदणी दिनांक : २५.०३.२०२२<br>निकाल दिनांक : ०२.०५.२०२६<br>कालावधी : **०४** व.,**०१**म., **०७** दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ९३/२०२२** **निशाणी क्र.– ४९**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ७८८/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | अनिल रमेश थोरात |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. आर.डी.ठाकरे |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २८/११/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०९/१२/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ००/००/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | १६/०६/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०३/१०/२०२२ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अनिल रमेश थोरात**<br>वय :३१ वर्ष, धंदा:मजुरी<br>रा. ग्राम–म्हसणी,<br>ता. मानोरा, जि.वाशिम. | ०९/१२/२०२१ | --<br>-- | भा.दं.वि. चे कलम ३९४ अन्वये | निर्दोष सोडले | –– | –– |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ०२/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २८/११/२०२१ रोजी सायंकाळी ०६:३० वाजताचे सुमारास मानोरा येथील अरुणावती नदीजवळील स्मशानभुजवळ घडली. दि.२७/११/२०२१ रोजी आरोपीने फिर्यादीला पुर्वीची ओळख दाखवली व त्यांच्यासोबत येतो असे म्हटले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीला मोटरसायकल वर बसवले, तेथून त्यांनी मिटींग केली व रात्री लाडेगांव येथील त्यांच्या माकाकडे मुक्काम केला. घटनेच्या दिवशी फिर्यादी व आरोपी मोटरसायकलने कारंजा वरुन मानोराकडे येत असतांना अरुणावती नदी पुलावर आरोपीने त्याला संडास आली असल्याचे सांगुन मोटरसायकल थांबवली. त्यानंतर आरोपीने गाडीची चाबी हरवल्याचे सांगुन फिर्यादीला चाबी शोधण्यास सांगितले. फिर्यादीला गाडीची चाबी सापडली नाही. फिर्यादी स्वतः गाडी ढकलत असतांना आरोपीने त्याचे हातातील काठीने

त्यांच्या डोक्यात मारले त्यामुळे ते खाली पडले. त्यानंतर आरोपीने त्यांच्या खिशातील ओपो कंपनीचा मोबाईल व ७०० रुपये काढले व तेथून पळून गेला. त्याअनुषंगाने फिर्यादीने मानोरा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्र.७८८/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा, अटक पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरुध्द भा.दं.वि. चे कलम ३९४ नुसार नि.क्र.२५ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र.२६ वर आहे. सरकारपक्षाने आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, सा.क्र.१ सैय्यद जुबेर सैय्यद रोशन (पंच) यांना नि.क्र.२७ वर तपासले आहे. प्रकरणात अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांचे मार्फत फिर्यादी, इतर महत्वपुर्ण साक्षीदार , तपासी अधिकारी व वैद्यकिय अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आले नाही. तसेच सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठले ही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर पारीत करण्यात आला. त्यानंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र.४७ वर नोंदविण्यात आले.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक २८/११/२०२१ | |

| | | |
|---|---|---|
| | रोजी सायंकाळी ०६:३० वाजताचे सुमारास मानोरा, ता.मानोरा, जि. वाशिम येथे अरुणावती नदीजवळील स्मशानभुमीजवळ आरोपीने दरोडा टाकण्याच्या प्रयत्न करुन फिर्यादी नामे संतोष रमेश सोनोने यांना मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबतः–</u>**

७. सा.क्र.१ सैयद जुबेर सैयद रोशन हे प्रकरणातील पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांचे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्याबाबत सांगितले. परंतु कथित घटना सिद्ध होणेकामी अभियोगपक्षामार्फत इतर कोणताही महत्वपुर्ण साक्षीदार तपासण्यात आला नाही. म्हणुन सा.क्र.१ यांचे पुराव्यावर दोषारोप सिद्ध होणेकामी विश्वास ठेवता येत नाही. अभिलेखावर उपलब्ध पुराव्या वरुन आरोपीचे विरुद्ध दोषारोप सिद्ध करणेस पुरेसी नाही. प्रकरणात अभियोगपक्षातर्फे फिर्यादी, इतर पंच, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तपास अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. गुन्हयाचे घटक सिध्द करण्याइतपत पुरक तोंडी व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः–</u>**

८. वरील बाबीवरुन असे दिसून येते की, कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने दरोडा टाकण्याच्या प्रयत्न करुन फिर्यादी यांना मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींला दोषी

ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.३ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** आरोपी **अनिल रमेश थोरात** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.02 17:35:55 +0530

मानोरा
दि. ०२/०५/२०२६

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
( न्यायालय क्र.२), मानोरा,

नियमित फौ.ख.क्र. १३/२०२२
सरकार .वि.अनिल (न्यायनिर्णय)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court | | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | | 02/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | | 02/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | | 02/05/2026 |